नि.दि.दावा. क्र. ९९/२०१२.
सुरेश वि. रामचंद्र व इतर.
**MHKO15001832012.**

## निशाणी क्रमांक ७३ खालील आदेश.

प्रतिवादींनी प्रस्तुतचा अर्ज दावा मिळकतीची दि. प्र. सं. आदेश २६ नियम ९ प्रमाणे दावा मिळकतीची न्यायालयीन आयुक्ता मार्फत पाहणी करुन वस्तूनिष्ठ अहवाल सादर करण्याचे आदेश करण्याकरीता दाखल केला आहे. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे, वादी हा दावा मिळकती बाबत चुकीचे कथन करुन त्याचा ताबा असल्याचे खोटे कथन करत असल्यामुळे तिची वस्तूनिष्ठ पाहणी करुन त्यातील घर, झाडे व पिके यांबाबतचा अहवाल सादर करण्यासाठी आयुक्तांची नेमणूक करणे गरजेचे आहे. सबब, त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**२.** वादीने नि. क्र.७६ प्रमाणे लेखी म्हणणे दाखल करुन अर्जास आक्षेप नोंदवला आहे. वादीच्या कथनाप्रमाणे, प्रतिवादींनी दावा प्रलंबित ठेवण्याच्या उद्देशाने खोटा अर्ज दाखल केला आहे. वादीने दावा मिळकतीमध्ये सुधारणा करुन झाडाबेटांची लागवड केली आहे. प्रतिवादी हे न्यायालयीन आयुक्ताच्या माध्यमातून पुरावा गोळा करण्याचा प्रयत्न करत आहे. प्रतिवादींचा अर्ज नामंजूर झाल्यामुळे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

**३**. वादी व प्रतिवादीच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. त्यांनी त्यांच्या अर्जातील व लेखी म्हणण्यातील कथनाप्रमाणे युक्तिवाद केला आहे. प्रस्तूत दावा हा निरंतर मनाई हुकूमाचा असून वादी व प्रतिवादींमध्ये दावा मिळकतीच्या चतुःसिमा अथवा हद्दीबाबतचा कोणताही वाद नाही. वादी व प्रतिवादी हे दावा मिळकती वरती त्यांचा ताबा असल्याचे कथन करत आहेत. त्यामुळे प्रतिवादींचा अर्ज मंजूर केल्यास न्यायालयीन आयुक्तांच्या चौकशी मधून दावा मिळकती वरील ताब्या बाबतचा पुरावा गोळा करण्याचा प्रयत्न होऊ शकतो.

**४**. दावा मिळकती वरती ताबा असल्याचे सिध्द करण्याची सर्वस्वी जबाबदारी वादी व प्रतिवादींची असून न्यायालयीन आयुक्तामार्फ त्याबाबतचा पुरावा गोळा करता येऊ शकत

नाही. सदर प्रकरणामध्ये न्यायालयीन आयुक्ताची नियुक्ती करावी अशी कोणतीही बाब पटलावरती आलेली नाही. सबब, प्रतिवादींची मागणी न्यायोचित नसल्यामुळे अर्ज नामंजूर करणे उचित ठरते. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे,

**<u>आदेश</u>**

१. अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. अर्जाचा खर्च दाव्याच्या अंतिम निकालाप्रमाणे राहील.

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

**(आर. पी. थोरे)**

न्या. अ. सां. क्र.– महा. ०२८९७

दिनांक – २८.०८.२०२५. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.